# प्रभुतरुण

वर्ष ५२ | अंक २ | मुंबई | सप्टेंबर, २०१८ | पाने ६ | किंमत रु. १

*(स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३)*

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर**

*कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*सहाय्यक संपादक:* **त्वरिता दळवी, राजेश नवलकर, भक्ती शेटचे**

## कृतज्ञ स्मरण



**श्री. सुहास विष्णुपंत कोठारे**

तसं तर आपण रोजच वाढत असतो. पण जन्माची तिथी किंवा तारीख लक्षात ठेवून वर्षानुसारे प्रत्येकाचा वाढदिवस छाऽऽन साजरा करण्याची आपली रीत आहे. माणसाप्रमाणेच माणसाने निर्माण केलेली बौद्धिक अपत्येही या वाढदिवसाची मानकरी असतात. उदा. एखादी संस्था, एखादा पंथ, एखादे दैनिक, मासिक, एखादा पक्ष वगैरे वगैरे. काही समविचारी मंडळी एकत्र येऊन विष्णुपंत कोठारे यांनी २५ ऑगस्ट १९२३ मध्ये आपला 'प्रभुतरुण' चालू केला; तो अशाच प्रेरणेतून. त्या दिवशी नारळीपौर्णिमा होती. गंमतीचा आणि आनंदाचा योगायोग म्हणजे यावर्षी २५ ऑगस्ट आणि नारळीपौर्णिमा एकाच दिवशी होती. तो योग साधून याच दिवशी आपल्या 'प्रभुतरुणा'चा वाढदिवस साजरा करण्याचे विश्वस्त आणि संपादकांनी ठरवलं - आणि अंधेरीच्या 'सुबा इंटरनॅशनल'मध्ये तो दिमाखात आणि घरगुती वातावरणात साजरा झालाही.

या मंगलदिनी, मंगलसमयी प्रमुख पाहुणे होते डॉ. प्रफुल्ल गजानन विजयकर. त्यांचाही वाढदिवस होता त्याचदिवशी. गोडी वाढली त्यामुळे. समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते आमचे विश्वस्त श्री. बन्सीधर धुरंधर. अतिशय नेटके सूत्रसंचालन केले कार्यकारी संपादिका असलेल्या भक्ती प्रधान-शेटचेनं. कार्यक्रमाची सुरुवात झाली ती भूतपूर्व संपादक स्वर्गीय श्री. सुहास कोठारे आणि श्री. विहंग नायक यांच्या प्रतिमांना पुष्पहार घालून. मंचावर डॉ. प्रफुल्लसह त्यांच्या सौभाग्यवती प्रीतीही होत्या. त्या दोघांचं स्वागत फुलांची सुशोभित कुंडी आणि मिठाई देऊन अध्यक्षांनी केलं. उपस्थित असलेले सदर लेखक श्री. विश्वास अजिंक्य यांनाही फुलांची कुंडी देऊन सन्मानित करण्यात आलं. त्याआधी कार्यक्रमाचं प्रास्ताविक मी केलं. सुहास कोठारे, विहंग नायक यांनी राखलेला प्रभुतरुणाचा वाङ्मयीन दर्जा निश्चितच अधिकाधिक भर घालून प्रभुतरुण कसा सांभाळतो आहे ते मी या वर्षीच्या 'प्रभुतरुणा'चं स्वरूप सांगून स्पष्ट केलं. संपादकीय, उद्यम्-संवाद-कथाकली-अद्‌भूत गोष्टी अशी विविध सदरं, संस्था आणि ज्ञाती घडामोडींचं वृत्त.. असं ज्ञान-मनोरंजन-संवादस्वरूप प्रभुतरुणाचं आहे. मे महिन्यापर्यंत अढळपदी असलेलं प्रदीप कोठारेंचे व्यंगचित्रही विसरता येणार नाही... ज्ञाती संस्थावृत्तासाठी चॅरिटीज, महिला समाज, सोशल समाज, सोशल क्लब आदी संस्थांचे अधिकारी मनापासून सहकार्य करतात; उत्स्फूर्त असं लेखनही प्रसिद्ध केलं जातं... असा नेटका आढावा मी घेतला. मी भर दिला तो 'प्रभुतरणा'च्या या वर्षीच्या देखण्या दिवाळी अंकावर. चित्रकार महर्षी रावबहाद्दूर म. वि. धुरंधर यांच्या दीडशेव्या जयंतीचे निमित्त साधून दिवाळी अंकात त्यांच्यावर विशेष भाग होता. ही दीडशेवी जयंती मग इतरत्रही पसरत गेली. चित्रकार सुहास बहुलकर यांनी दिल्लीला प्रदर्शन भरवलं. संदीप दहिसरकर यांना धुरंधरांवर खास अभ्यास करण्यासाठी आवाबेन शिष्यवृत्ती मिळाली. श्री. दीपक घारे यांनी धुरंधरांचे 'कलाजगतातील एकेचाळीस वर्षे' हे आत्मकथन पुन्हा संपादित केलं आणि त्याचं प्रकाशन

## संपादकीय

# अनादि मी, अनंत मी

**—सुहासिनी कीर्तिकर**

एकतीस तारखेला सॉलिसिटर श्री. राजन जयकर यांच्या हस्ते होणार आहे... असं सगळं मी उपस्थित श्रोत्यांना सांगत परत एकदा दिवाळी अंकाच्या आनंदाची लयलूट केली. मात्र एवढ्यावर आपल्याला थांबता येणार नाही; याचंही भान मी राखलं अन् कार्यकारी संपादकपदी असलेल्या तरुण मंडळींना आवाहन केलं की त्यांनी २०२३ साली येणाऱ्या प्रभुतरुणाच्या शताब्दीसाठी 'पंचवार्षिक योजना' आखावी. प्रभुतरुण बोर्डाचे हे मासिक. या व्यतिरिक्त बोर्डाने काही आगळे उपक्रम हाती घ्यावेत असं आवाहन दोन वर्षांपूर्वी श्री. बन्सी यांनी केलं होतं; त्या संदर्भात या तरुणांनी विचार करावा असंही सुचवलं. समारंभाचे अध्यक्ष डॉ. प्रफुल्ल हे मानवसेवेसाठी आपला डॉक्टरी पेशा कसा जगताहेत; तेही अधोरेखीत करणं अटळ होतं. डॉ. प्रफुल्ल यांच्या पडद्यावरील सादरीकरणातून नंतर ते सर्वच उपस्थितांपर्यंत थेट पोहोचलं.

यानंतर समारंभाचे अध्यक्ष श्री. बन्सी धुरंधर यांनी मनोगत व्यक्त केलं. ते नेहमीप्रमाणेच अतिशय हृद्य आणि विचारांना गती देणारंच होतं. प्रभुतरुणाच्या संपादकीयांचं त्यांनी मनभरून कौतुक करून त्याचं एक पुस्तक व्हावं; अशी अपेक्षा व्यक्त केली. तरुण कार्यकारी संपादक मंडळाच्या उर्जेचं कौतुक केलं. प्रमुख पाहुण्यांची अतिशय उचित आणि विनोदाची पखरण करीत ओळखही त्यांनी करून दिली. इतर डॉक्टर्स कसा व्यवहार पहातात अन् पैसे जमा करतात; तर डॉ. प्रफुल्ल या पेशात कशी यशस्वी वाटचाल करताहेत ते त्यांनी खुसखुशीत विनोदाची पखरण करून सांगितले. डॉक्टर म्हणून ते थोर आहेतच; पण माणूस म्हणूनही ते कसे 'जंटलमन' आहेत ते सांगताना श्री बन्सी यांनी अफलातून उदाहरण दिले. 'स्वयंपाकघरात डॉ. प्रफुल्ल फ्रिजच्या दारावर आधी 'टकटक' करतात; मग दार उघडतात! '....व्वा! पण अर्थातच हे केवळ गंमतीत. डॉ. प्रफुल्ल यांना 'कॉर्पोरेट डायमेन्शन' कसं आहे आणि तरीही ते 'प्रभुतरुणा'शी कसे जवळीक साधून आहेत; ते बन्सींनी अधोरेखीत केलं. डॉ. प्रफुल्ल विजयकरांना आजपर्यंत अनेक सन्मान लाभले आहेत. येत्या २६ जानेवारीसाठी त्यांचे 'पद्मश्री' पदवीसाठी नामांकन झाले आहे. ती त्यांना मिळेलच अशी खात्री त्यांनी दिली. अन् शुभेच्छाही. माझ्या भाषणातही मी डॉ. प्रफुल्ल यांच्या या नामांकनाविषयी बोलले होते. ते सांगताना मी म्हटलं की 'पद्मश्री' मिळण्याआधी आपण सर्वांनी त्यांना एक पदवी आधीच बहाल केली आहे - ती म्हणजे 'प्रभुभूषण'.

डॉ. प्रफुल्ल खरोखरच 'प्रभुभूषण' कसे आहेत; त्याची प्रचिती त्यांच्या भाषणात पदोपदी येत गेली. त्यांचं भाषण म्हणजे त्यांच्या जगण्याची, 'ध्येय-आकांक्षा' यांची पूर्ती कशी होते त्याचा दृष्टान्त होण्याची आणि अर्थातच त्यांच्या कार्याची प्रचिती देणारं साक्षात्कारी भाषणच होतं. ते सगळंच्या सगळं इथं संपादकीयात 'कोंबणं' केवळ अशक्य आहे. तरीही त्यातील काही ठळक गोष्टी मात्र सांगायलाच हव्यात. त्यांनी प्रथम सुहास कोठारेंचे ऋण मान्य करीत म्हटलं की, 'मी आजपर्यंत नऊ पुस्तकं लिहिली; चार प्रकाशनाच्या मार्गावर आहेत. पण मला लिहीतं केलं ते सुहास कोठारेंनी; प्रभुतरुणाने. 'प्रभुतरुणा'त मी 'दवाखान्याच्या उंबरठ्यावर' हा लेख लिहिला. काही कविताही लिहिल्या. विहंग नायकांनी तरुण मुलं एकत्र केली. त्यातून माझ्या मुलाने लग्न केले. 'प्रभुतरुणा'च्या पडघम कार्यक्रमात मी कव्वाली सादर केली होती; त्याची मला अजूनही आठवण आहे.' दुसरी बाब त्यांनी ठळक केली ती सध्याच्या मराठी वाचन संस्कृती बद्दलची. आजकाल तरुणाई मराठी वाचत नाही. पण त्यांनी मोबाइलवर वाचणे सुरू करायला हवे. त्याला त्यांनी उदाहरण दिलं ते हिब्रू भाषेचं.

(पान २ कॉलम १ वर)

संपादकीय

(पान १ कॉलम ४ वरून)

हिब्रू ही दगडावर कोरून तयार झालेली भाषा आहे. तिला कानामात्रा नाहीत. मात्र आजही हिब्रूंच्या प्रत्येक घरात लहान मुलांपासून हिब्रूच बोलली जाते. मराठी वाचत आपण असा आग्रह धरायला हवा. नंतर अर्थातच ते आपल्या 'होमियोपॅथी' या लाडक्या अन् सर्वस्व असणाऱ्या विषयाकडे वळले. श्री. बन्सी यांनी प्रफुल्लच्या 'प्रेडिक्टीव होमियोपॅथी' बद्दल गौरवानं सांगितलं होतंच. पुण्याला जाणाऱ्या हायवेच्या बोगद्याआधी या प्रेडिक्टिव्ह होमियोपॅथीचं मोठ्ठ होर्डिंग आहे. त्याचा उल्लेखही बन्सींनी केला होता. ते 'होर्डिंग' एका पेशंटने लावल्याचे डॉ. प्रफुल्ल यांनी स्पष्ट केले आणि या होमियोपॅथीकडे ते कसे वळले; त्याविषयी त्यांनी आत्मकथनही केले. आजोबा, वडील (डॉ. गजानन विजयकर) हे ॲलोपॅथीचे डॉक्टर. शिक्षणात सर्वत्र अव्वल असूनही डॉ. प्रफुल्लना मात्र ॲलोपॅथीसाठी प्रवेश मिळाला नाही. ते 'अज्ञानातील आशीर्वादा'चे साक्षात रूपच होते. कारण म्हणून या क्षेत्रात त्यांना प्रेडिक्टिव्ह होमियोपाथ' म्हणून माणसांची अमाप सेवा करता आली. डॉ. प्रफुल्ल यांचा 'कार्यपरत्वे' जन्म आहे असं मी प्रास्ताविकात म्हटलं होतं; त्याला त्यांनी यावेळी असा दुजोरा दिला. 'आपल्या शरीरातील क्रॉनिक डिसऑर्डर प्रिडीक्टीव्ह होमियोपॅथीने पूर्ण बरी होऊ शकते'. असा अनुभवसिद्ध दावाच त्यांनी केला. त्यासाठी मोठ्या पडद्यावर त्यांनी उदाहरणे प्रक्षेपित केली. या प्रक्षेपणाची सुरुवात झाली ती डॉ. गजानन विजयकर यांच्या छायाचित्राने. त्यानंतर डॉक्टरांनी आशा सोडून दिलेल्या अनेक रुग्णांना केवळ या होमियोपॅथीने कसे बरे केले; त्याची चकीत करून टाकणारी चित्रे पडद्यावर पाहाता आली. जीव शाश्वत असतो, शरीर अशाश्वत असते. त्या जीवावर होमियोपॅथी उपचार करते. शरीराला जडलेल्या कोणत्याही दुखण्याचा जन्म आईच्या गर्भात होतो. ज्या स्त्रीला सतत अवहेलना सोसावी लागते; अशा स्त्रीला होणारे अपत्य शारीरिक दुखणे घेऊन येते. म्हणून त्यावर आतून इलाज केला पाहिजे. होमियोपॅथीचे औषध हे सात्विक औषध आहे. डॉ. सॅम्युअल फ्रेडरिक हॅनिमॅनने अडीचशे वर्षापूर्वी होमियोपॅथीवर ग्रंथ लिहिला; त्यात जीवाला महत्त्व आहे. 'ट्रीट द कॉज, डिसीज वुइल डिसअपिअर' हे त्यांचे सूत्र. मन शरीराला आज्ञा देते; म्हणून ते समजून घेऊन औषधोपचार करायला हवेत; हे या हॅनिमॅनने शिकवले. त्यातून डॉ. प्रफुल्ल यांनी 'होप फॉर द होपलेस' प्रोजेक्ट आणि कॅम्पस सुरू केले. पडद्यावरील रुग्णांची चमत्कार घडावा तशी बरे झाल्याची चित्रे पहाताना आम्हाला (प्रेक्षकांना) खरोखरच 'जादूचे प्रयोग' पाहिल्यासारखेच वाटत होते. उदा. शरीरात तीनशे एक फ्रॅक्चर्स असलेला सळ्या घातलेला सतरा वर्षांचा मुलगा डॉ. प्रफुल्लनी बरा केला. अन् हे सगळे मानवसेवा म्हणून केलेले त्यांचे कार्य. विनामूल्य सेवा. आज ते ब्राझील, स्वीत्झर्लंड, कॅनडा, रशिया... अशा नऊ देशात, महाबळेश्वर, मुंबई, राजस्थान अशा भारतातील प्रदेशात हे 'फ्री मेडिकल कॅम्प' दर महिन्याला घेतात. तीस ते चाळीस हजार रुग्ण याचा लाभ घेतात, बरे होतात. या त्यांच्या कार्यासाठी त्यांना लोकमत, महाराष्ट्र टाइम्स यांनी गौरविले आहे. त्यांची ही होमियोपॅथी युनायटेड नेशननी मान्य केलीय. डॉ. प्रफुल्ल आणि डॉ. अंबरीष (त्यांचा सुपुत्र) यांना यासाठी त्यांनी मानद डॉक्टरेट पदवी बहाल केलीय.

आपल्या कार्याचं असं चित्रण प्रक्षेपित करीत असतानाच त्यांनी एक महत्त्वाचा मुद्दा मांडला की 'चांगलं काम केलं की न्याय मिळतोच. म्हणून 'डोण्ट प्रॅक्टीस रॉंगली' आपलं सत्कर्म हाच देव असतो.''

या वर्धापनदिनी अनेक सुहृदांकडून देणग्या येतात. तशा याही वर्षी आल्या. त्यांचे वाचन सौ. मिहिरा नवलकरने केले. विश्वस्त श्री. गुंजारव नायकने आभार मानले.

त्यानंतर रंगला गाण्याचा कार्यक्रम सौ. संजना दीपक कोठारे या आमच्या कार्यकारी संपादिकेची 'म्युझिकल फॅमिली ग्रुप' ही संकल्पना संगीताशी जोडलेली. हौशी मंडळी घेऊन हा छोटा ग्रुप तिनं तयार केलाय. त्यांचा हा कार्यक्रम सुरू होताच सभागृहात चैतन्य संचारलं. सौ. विदुला कोठारेने 'रेशमाच्या रेघांनी' ही लावणी बहारदार सादर केली. तिचा मुलगा विहान. आठ-दहा वर्षांच्या या मुलाने 'तुझसे नाराज नही जिंदगी', 'मेरी माँ' अशी गाणी; तीही 'करावके'वर कसरत साध्य करून उत्तम गायिली. गाणे शिकणाऱ्या या मुलाचे भवितव्य उज्ज्वलच असणार. सागर आणि शिवानी देवरूखकरांनी 'इतनीसी हँसी', 'दिल है छोटासा' म्हणून बहार आणली. 'याद किया दिलने कहाँ' हे गाणे विदुला कोठारे आणि मोहनीश शेटचे यांनी अप्रतिम गाऊन गाण्याच्या जुन्या जमान्यात नेले. सागर देवरुखकरने 'गुलाबी आँखे' स्वतंत्रपणे पेश केले; तर मोहनीश शेटच्चेने 'रिमझिम गिरे सावन' म्हणत बाहेरच्या पावसाला प्रेममय सूर दिला. शिवानी देवरुखकरचे 'सँवार लू' हे गाणेही श्रोत्यांवर स्वार झाले. या कार्यक्रमाची सुरुवात विदुलाच्या मंगलाचरणाने झाली. पूर्वीचा 'पडघम' कार्यक्रम डॉ. प्रफुल्ल, डॉ. प्रदीप विजयकरांच्या मनात जागा झाला. त्यावेळी त्यांनी म्हटलेली 'ना तो कारवाँकी तलाश है।' ही कव्वाली मग ती दोघं आणि त्यांची बहीण सौ. वैशाली आनंद राणे यांनी म्हणत कार्यक्रमाचा माहोलच बदलून टाकला. कार्यक्रम उत्तरोत्तर रंगत गेला हे सांगणे नलगे.

आपल्या मनोगतात श्री. बन्सीधर धुरंधर यांनी म्हटलं होतं की 'प्रभुतरुण'वर प्रेम करणारे, आधार असणारे अनेकजण काळाच्या पडद्याआड गेले. नुकतेच श्री. प्रदीप कोठारे आणि डॉ. विनोद धुरंधर यांना आपण मुकलो. डॉ. विनोद यांचे बुंदीचे लाडू प्रभुतरुणाच्या वाढदिवशी भेट असायचे. त्यांच्या पत्नी सौ. अनुराधाकाकीही नाहीत आता. पण तरीही 'प्रभुतरुण' असणारच. कारण 'प्रभुतरुण' 'अनादि मी, अनंत मी' असाच आहे' या त्यांच्या विधानाचे प्रत्यंतर या कार्यक्रमात आले. यापुढेही 'प्रभुतरुण' अनादि, अनंत असाच असेल!

## प्रभुतरुण वाढदिवसानिमित्त देणग्या

| | | | |
|---|---|---|---|
| १ | डॉ. प्रफुल्ल विजयकर | रु. | २५,०००/- |
| २ | श्रीमती नेत्रा व श्री. अजित विजयकर<br>(लीला आणि मोरोबा विजयकर यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ) | रु. | ११,०००/- |
| ३ | डॉ. सौ. सुरेखा व श्री. बन्सीधर सदाशिव धुरंधर | रु. | ५,००१/- |
| ४ | श्रीमती माधुरी विहंग नायक | रु. | ४,०००/- |
| ५ | श्रीमती बागेश्री व योगेन परीख | रु. | २,५००/- |
| ६ | श्री. दीपक धैर्यवान | रु. | २,५००/- |
| ७ | चि. शौर्य व चि. वीर गुंजारव नायक<br>(कै. विहंग नायक यांच्या स्मरणार्थ) | रु. | २,०००/- |
| ८ | श्रीमती नीता व श्री. दीपक बाळकृष्ण विजयकर | रु. | २,०००/- |
| ९ | श्रीमती वृंदा शाम जयकर<br>(कै. शाम जयकर यांच्या स्मरणार्थ) | रु. | १,००१/- |
| १० | चि. ईशान व चि. नीष्का दीपक कोठारे | रु. | १,००१/- |
| ११ | श्री. किरण नवलकर व योगिता नवलकर | रु. | १,००१/- |
| १२ | श्रीमती मीनाक्षी शिवनाथ देसाई | रु. | १,००१/- |
| १३ | श्री. विजय व सौ. वृषाली वि. प्रभाकर<br>(कै. माधव प्रभाकर व श्री. नारायण कोठारे स्मरणार्थ) | रु. | १,०००/- |
| १४ | श्रीमती शुभांगी हेमचंद्र प्रधान | रु. | १,०००/- |
| १५ | सौ. नीता व श्री. मिलींद सेनजीत | रु. | १,०००/- |
| १६ | श्री. सुनील प्रभाकर व अश्विनी थरवळ | रु. | १,०००/- |
| १७ | श्री. मिहीर विनोद धुरंधर | रु. | ५०१/- |
| १८ | श्रीमती सुरुची व श्री. अनिल प्रधान | रु. | ५०१/- |
| १९ | श्रीमती सुबोध प्रधान | रु. | ५००/- |
| २० | चि. मान्या मिथील मिहीका नवलकर | रु. | ५००/- |
| २१ | चि. राहील रितेश कीर्तिकर<br>(कै. शेखर खंडेराव विजयकर स्मरणार्थ) | रु. | ५००/- |
| २२ | श्री. प्रताप वेलकर | रु. | १०१/- |

## इतर देणग्या

| | | | |
|---|---|---|---|
| १ | सौ. सीमा नारायण अजिंक्य<br>(कै. सुनंदा हणमंतराव अजिंक्य व<br>कै. नारायण हणमंतराव अजिंक्य यांच्या स्मरणार्थ) | रु. | ५००१/- |
| २ | श्रीमती अंजली धराधर<br>(कु. सायली मिलींद धराधर हिच्या M. Pharm परीक्षेतील उज्ज्वल यशाप्रीत्यर्थ. O Grade CGPA: 8.55 ) | रु. | ५००/- |

## दिवाळी भाऊबीज

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती सुहासिनी सुहास कोठारे | रु. | १,००१/- |

## आवाहन

'प्रभुतरुण' दिवाळी अंकासाठी ज्यांना भाऊबीज द्यायची असेल त्यांनी ती डॉ. सुरेखा धुरंधर यांच्याकडे पाठवली तरी चालेल. सौ. प्रतिमा प्रधान दरवर्षीप्रमाणे हे काम पहात आहेतच. फक्त सोयीसाठी ही व्यवस्था. कृपया नोंद घ्यावी.

## जाहीर निमंत्रण

कनकाई देवी उत्सवाचे राजपुरिया बाग, नवीन ठक्कर मार्ग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई-५७ येथे आयोजन करण्यात आले आहे. दि. १०-१०-१८ ते १८-१०-१८ पर्यंत हा उत्सव असेल. या उत्सवातील **ठळक कार्यक्रम-**

१०-१०-१८ सकाळी ७.१५ घटस्थापना

१२-१०-१८ संध्याकाळी ६ नृत्य आणि गीते, (कीर्तिकर परिवारातर्फे प्रायोजित)

१४-१०-१८ सकाळी ८.३० मुलांसाठी खास कार्यक्रम, दुपारी ४ दांडिया रास, गरबा

१७-१०-१८ संध्याकाळी ५ अष्टमी हवन पूर्णाहुती

दैनिक आरती – सकाळी आणि संध्याकाळी ८.३० वाजता

सर्व भक्तांना देवीच्या दर्शनासाठी सहकुटुंब आमंत्रित करीत आहोत.

निमंत्रक,<br>
श्री. उमेश कीर्तिकर ९८६९२२८४८९<br>
श्री. तुषार कीर्तिकर ९८१९४२३१९३<br>
श्री. अमोघ कीर्तिकर ९३२३२८११३१<br>
(सभासद - माताजी कनकेश्वरी परिवार.)

*

कथाकली

# समजूतदार

-सौ. उज्ज्वल र. ब्रह्मांडकर

''एऽऽ शर्मन, अरे आहेस कुठे? दिसला नाहीस एवढ्या दिवसांत?'' नवीननं शर्मनला हाक मारीत विचारलं.

''अरे रजेवर होतो. नोकरी सोडणार आहे मी ही. दुसरीकडे खूप चांगल्या पगाराची नोकरी मिळतेय. रजेमध्ये तीन चार ठिकाणी इंटरव्यू दिलेयत.''

''बरं, आता चहा घ्यायला चलं,'' असं म्हणत नवीन चहाच्या मशीनच्या दिशेनं गेला. दोघांनीही कपात चहा काढून घेतला आणि घुटके घेत ते गप्पा मारू लागले. तेवढ्यात त्यांना चिराग घाईघाईनं लिफ्टकडे पळताना दिसला. ते बघताच नवीननं त्याला हाक मारून विचारलं, ''ए चिराग कुठे पळतोयस?''

चिरागनं वळून त्यांच्याकडे बघत धावता धावताच सांगितलं - ''चला लवकर. लिफ्टमध्ये सांगतो.''

तसे दोघेही चिरागच्या मागे धावले - लिफ्ट सुरू होताच चिरागनं सांगितलं - ''शर्मन, अरे तुझ्या सेक्शनमधला संपन्न बेशुद्ध पडलाय.''

''आं? कशानं? - नवीननं आश्चर्यानं विचारलं.

''मला असं कळलंय की तो ड्रग्ज घेतो.''

ते बोलत असतानाच लिफ्ट थांबली आणि ते तिघंही धावतच संपन्नच्या सेक्शनमध्ये शिरले.

संपन्न खाली जमिनीवर बेशुद्ध पडला होता. कुणी त्याचे हातपाय चोळीत होते तर कुणी त्याच्या तोंडावर पाणी मारीत होते. कुणी कँटीनमधून फोडून आणलेला कांदा त्याच्या नाकाशी धरत होते.

ते बघताच चिराग म्हणाला - ''हा ह्या उपायांनी शुद्धीवर येणार नाही. मी कुठंतरी वाचलंय की ड्रग्ज घेणारा जर बेशुद्ध झाला तर त्याला हॉस्पिटलमध्येच न्यावं लागतं'' चिराग म्हणाला नी संपन्नच्या टीम लीडरला हाक मारून म्हणाला - ''अक्षत, संपन्नच्या घरी फोन लाव.''

अक्षतनं ताबडतोब त्याच्या घरी फोन केला - पलीकडून एका बाईचा आवाज आला - अक्षतनं विचारलं - ''तुम्ही संपन्नच्या आई कां?''

''हो. कोण बोलतंय?''

''मी त्याच्या ऑफीसमधून त्याचा टीम लीडर अक्षत बोलतोय. संपन्न बेशुद्ध झालाय. त्याला हॉस्पिटलमध्ये दाखल करावं लागेल. व्यवस्था करतो.''

''छे! मला नाही जमायचं तिकडे यायला. माझं आज 'वुमन्स क्लब'मध्ये भाषण आहे - 'पालकांची कर्तव्यं'. ह्या विषयावर. मी आत्ता तिकडेच निघतेय. मी माझा सेल नं. देते. तुम्ही मला हॉस्पिटलचं नाव कळवा. संपन्नच्या बाबांना मी सांगेन. ते त्या हॉस्पिटलला फोन करून त्याची उत्तम व्यवस्था करायला सांगतील....'' असं म्हणून संपन्नच्या आईनं फोन ठेवलासुद्धा.

अक्षतनं हे सांगताच प्रत्येकाच्याच चेहऱ्यावर मोठं प्रश्नचिन्ह उभं राहिलं.

''तिकडे त्याची आई पोहोचेपर्यंत संपन्नबरोबर कुणी तरी राहायला हवं. मी असेनच... तुमच्यापैकी कोण...'' अक्षतनं सूतोवाच करताच प्रत्येकानं तिकडून काढता पाय घेतला. शेवटी चिराग, अक्षत, शर्मन आणि नवीन हे चौघंच उरले.

''मी मॅनेजरना सांगतो. तुम्ही सगळेच चला...''

भराभर चक्रं फिरली-

ॲम्ब्युलन्स जवळच्याच अश्विनीकुमार हॉस्पिटलकडे निघाली. लगेच अक्षतनं संपन्नच्या आईला हॉस्पिटलचं नाव कळवलं.

हॉस्पिटलमध्ये पोहोचताच हेड नर्स धावत आली आणि तिनं विचारलं - तुम्ही 'युनिव्हर्स' मधला हा 'संपन्न' आणलायना?

सगळ्यांनाच आश्चर्य वाटलं - ''तुम्हाला कसं कळलं?''

''त्याचे वडील खूप मोठे उद्योजक आहेत नं, त्यांनी फोन करून सर्व सुखसुविधांनी युक्त अशी स्पेशल रूम बुक केलीय''- हेडनर्स उत्तरली.

संपन्नला त्या रूममध्ये हलवताच डॉक्टरांचं एक पथकच खोलीत शिरलं आणि ताबडतोब उपचार सुरू झाले. थोड्याच वेळात संपन्न शुद्धीवर आला. त्याचे डोळे सर्वांवर फिरले. तो म्लानपणे हसला. त्याची नजर कुणाला तरी शोधत होती - त्यानं विचारलं, ''माझे आईबाबा कुठेयत? त्यांना बोलवा.''

त्याबरोबर सगळे एकमेकांकडे बघू लागले. तशाही अवस्थेत संपन्न ते हेरून म्हणाला-'' मला माहीत आहे, ते आलेच नसणार.

''अं... येतील ते लवकर'' - नवीननं पुढं होऊन सांगितलं.

''बोलू नकोस. स्वस्थ झोप बघू.''

''मला बोलू दे. कदाचित त्यामुळं मला बरं वाटेल'' संपन्न म्हणाला. डॉक्टरांनी त्याची बाजू उचलून धरली. हा आत्महत्येचा प्रयत्न किंवा अपघात असू शकत होता. पोलिसांना बोलावलंच होतं. त्यांनाही जबानी नोंदवून घ्यायची होती.

संपन्न सांगू लागला - ''आमच्या घरी हेच चित्र असतं. बाबांना वेळ नसतो - फक्त पैसे खर्च करता येतात - नी आईला समाजसेवेपुढे फुरसदच नसते. म्हणून मला फार एकटं वाटायचं. लहानपणापासून ह्याच श्रीमंतीचा मी तोरा दाखवायचो. आता आतापर्यंत ऑफिसातसुद्धा हेच तोऱ्याचं नाटक मी चालू ठेवलं होतं. त्या फसव्या श्रीमंतीच्या नशेत कायमच राहायचो - मनाच्या शांततेसाठी ही ड्रग्ज घ्यायला सुरुवात केली. तुमच्यात मिसळण्याऐवजी मी तुम्हाला विशेषत: आर्चितला तोरा दाखवायचो. त्याच्या परिस्थितीची निंदा करायचो...''

श्रीमंत परिस्थितीमुळे संपन्न येता जाता सगळ्यांचा अपमान करायचा. आणि आज त्याच श्रीमंत परिस्थितीत श्रीमंत आईवडिलांमुळे तो एकटा पडलाय... नवीनच्या मनात विचार उमटले.

नवीन हळूच शर्मनला म्हणाला, ''ही श्रीमंती काय कामाची? त्याला इथं आणायला, इथं त्याच्याजवळ थांबायला माणसंच जरूरीची ठरली नं?''

''खरंय! त्यालासुद्धा हे कळलंय. त्याची पैशाची घमेंड साफ उतरलीय बघ - माणसं आणि तीसुद्धा मनाच्या जवळची, अंत:करणापासून काहीच क्षणांच्या अंतरावर असणारी माणसंच आवश्यक असतात'' - शर्मन 'माणसं' ह्या शब्दावर जोर देत कुजबुजला.

संपन्ननं त्यांचं संभाषण ऐकलंच. आणि तो म्हणाला - ''खरंच! पैसा सगळ्याच गोष्टी नाही करू शकत हे आज लक्षात आलंय माझ्या. नवीन, मी तुम्हा सर्वांची माफी मागतो. मी तुम्हाला माझ्या उद्दाम वागण्यानं खूप त्रास दिला. आर्चितचीसुद्धा माझ्यातर्फे माफी मागा...''

''शर्मन, संपन्नचा अर्चित होणं टाळावं लागेल. त्यासाठी आपण त्याला माफ करायला हवं'' नवीन उद्‌गारला.

''खरंय!'' असं म्हणून सगळेच संपन्नच्या कॉटजवळ गेले आणि म्हणाले - ''संपन्न, झालं गेलं विसरून जा. शांत रहा. आम्ही तुला कधीच माफ केलंय..''

''आतां मला खूप बरं वाटतंय. पूर्वी खूप एकटं आणि म्हणून असुरक्षित वाटायचं. तुम्ही सगळे शाळेतल्या घरच्या माणसांबद्दल बोलायचात, कारण तुमच्या घरी माणसं, तुमच्या हक्काचे आईबाबा तुमच्याजवळ असायचे. पण आधी ते रागावले, ओरडले तर तुम्हाला नकोसे वाटायचे. नेमक्या त्याच गोष्टीचा फायदा घेऊन मी पैशांची घमेंड दाखवायचो. माझे आईबाबा मला माझ्याजवळ कधीच सापडले नाहीत.''

''संपन्न, तुझ्याजवळ नी अर्चित जवळ तुमचे आईबाबा असून नसल्यासारखे होतायत. तुमच्या मनाजवळ आहे ते त्यांचं तुमच्या बाबतीतलं दुर्लक्ष. भले वेगवेगळ्या कारणांनी झालेलं. पण आईबाबांना सतत आरोपीच्या पिंजऱ्यात उभं करू नका रे तुम्ही. त्यांना समजून घ्या. त्यांच्याजवळ वेळ किंवा पैसा नसेल त्याबद्दल त्यांना दोष देऊ नका'' - नवीन म्हणाला.

''पण त्यांच्या आईवडिलांनी सुद्धा त्यांना समजून घ्यायला हवं''- इतका वेळ त्यांचं बोलणं ऐकत असलेले डॉक्टर म्हणाले - त्यांना ते सांगायचं काम मी करीन. प्रत्येक व्यक्ती स्वातंत्र्य म्हणून किंवा पैसा कमवायचा म्हणून बराच वेळ घराबाहेर असतो. त्यातूनच दोन पिढ्यांमधला दुरावा निर्माण होतो नी वाढत जातो. संपन्न, तुझे वडील मोठे उद्योगपती आहेत. त्यांना समाजात स्वत:च स्थान आहे. ते एक पब्लिक फिगर आहेत. म्हणून त्यांची पत्नी ह्या नात्यानं तुझ्या आईलासुद्धा समाजात अव्वल दर्जा प्राप्त झालाय. म्हणून तिला सतत कुठे ना कुठे उद्‌घाटनाला, परिसंवादाला, व्याख्यानाला जाऊन समाजाच्या तिच्याकडून असलेल्या अपेक्षा पूर्ण कराव्याच लागतात. गरज आहे ती एकमेकांना समजून घेण्याची आणि तुम्ही मुलांनीसुद्धा त्यांच्या मर्यादा समजून घ्यायला हव्यात. बघा - परस्परांना समजून घेण्याच्या उदार मनोवृत्तीनं तुम्हाला तुमची परस्परांबाबतची मत चुकीची आहेत हे पूर्णपणे पटेल...मघाशी तुझ्या वडिलांबरोबर बोलणं झालंय माझं. त्यांना पटलंय माझं सांगणं... आईलाही पटेल..''

संपन्नलाही खरंच आईवडिलांच्या 'आधारा'ची सततची गरज चुकीची वाटू लागली...

आणि तो अगदी लहानपणीच्या निरागस संपन्न बनण्याच्या वाटेकडे आपसूकच वळला....

*

## द पाठारे प्रभु चॅरिटीज

संस्थेचे जुलै २०१८ चे 'न्यूज लेटर' घरोघरी सर्वांना प्राप्त झाले. त्यात डिसेंबरमध्ये होणाऱ्या 'सिल्व्हर ज्युबिली एज्युकेशन मेरीट प्राइज अवॉर्ड' समारंभाविषयी पहिल्याच पानावर माहिती आहे. ३ जून २०१८ ला झालेल्या सर्वसाधारण वार्षिक सभेचा अहवाल आहे. आठ सप्टेंबर रोजी श्री. व्यंकटेश मंदिर, ठाकुरद्वार येथे श्री. हनुमान सार्वजनिक फुलांच्या वाडीबद्दल बातमी आहे. रिलीफ फंडाचा नेमका अहवाल आहे अन् अजून बरेच काही. छायाचित्रांमुळे हा अहवाल रंगीन झाला आहे. संस्थेचे अभिनंदन.

*

बालविभाग

# The Waiting Room

**-Armaan . A . Kothare**
www.armaankothare.blogspot.com

It was 2 hrs for my family and me to leave for Goa. Mom had this weird idea to reach the Railway Station early, because she thought that way we could be certain the train hadn't arrived yet. I tried to talk some sense into her, but it was almost obvious whose opinion would be taken into consideration. Anyway, we reached the station. Mom and I thought that the station would nearly be empty, but we didn't realise that there were other trains arriving at that hour. There were thousands of people running here and there to enter their trains. Dad said, we could wait in the waiting room. We all agreed with his idea. Then I finally sat down, only to get a glimpse of everyone.

The room was quite small. It had just enough space for our lot. There were about two families and two couples, excluding Mom, Dad and me. Out of the old couple, the old man who looked like he was in his sixties or seventies, got up from his seat and limped over to the restroom. The woman, who looked a little younger than the man, took out her phone and earphones and (maybe) started video calling someone.

The family of three, occupied the three recliner sofas and set to work. The teenager, who was the youngest of the family and was probably here for educational purposes, removed this book on commerce and got absorbed into it. His mom, who I suppose had nothing to do, stared at her son and continued to do so until she fell asleep. The father, who seemed quite handsome, unexpectedly removed his phone and started playing a video game!!! From the above, I learnt a short lesson: Adults do not look good when they're engrossed in video games. I tried not to laugh.

The next family was quite boring. The boy, who was a 4th or a 5th grader, pulled out his Kindle and started a chapter book. His mom started to apply nail polish in such a way as if it was the most important thing to do. And his father gaped at them for he had nothing to do. I think he might have been having second thoughts on getting a Kindle for his son instead of himself.

And the last family decided to take advantage of this valuable time by arguing. I don't know what exactly they were arguing about, but I guess the husband unknowingly said something that insulted the wife, because their conversation went on something like this:

"What do you mean?? "

"Sorry???"

"I clearly heard what you said!!!"

"I'm overreacting????"

"Yeah right you piece of…."

Then they included a few inappropriate words in their argument. The whole room echoed with their screeches.

Finally, it was the time for us to get up and leave. The old man came out from the restroom, a relaxed expression on his face. Then it hit me. We were all in the same train! This would give me more time to observe them. Then I sat down, a frown on my face as the couple continued to yell and argue.

✳

# Room

**-Adhar Kothare**

Today while cleaning up my cupboard I came across some old pictures, and a few writings that I had done in my diary back then, may be during college days. Days when technology was not as developed and as advanced as today, when selfies didn't exist, clicking a picture with friends, or that special someone required prior planning; starting from asking dad for his camera, buying a 36 photo camera roll, clicking the pictures you had no clue how they would turn up and waiting for the pictures to get developed to see how have they come. Days when mobile had just arrived in India and messaging someone also cost one's pocket, when apps like whatsapp and google allo weren't even dreamt off, but on the other hand people had time for each other, when conversations were not made through social media, but by actually taking time out and meeting each other. With technology developed so much today and our day now starting with checking whatsapp, twitter and facebook before even brushing our teeth, I thought of sharing this little piece of thought that I had come across back then.

Most of us reading this, had that special someone in some phase of our life, someone who we really liked or loved, as the case may be, more than anyone else, someone with whom we wanted to spend the rest of our life, but couldn't by sheer not admitting or expressing our feelings to that person. Most of us probably had millions of words to say, tons of feelings to express to that one person, but never really had the courage to take that step ahead. And invariably the reason was fear of rejection. Sometimes the case was more like, one falling in love with your best friend but not expressing one's feelings to that person, fearing denial and in lieu also losing the friendship. The moment we decided of expressing the feelings the first thought that crossed our minds was "what if it's a no?". That thought itself crumpled the whole courage of admitting what was true.

Whereas in reality, one should always express one's feelings. Because by not doing so, one doesn't realise that one day the feeling of losing the person you love for lifetime to someone else, the feeling of seeing that person marry to someone else is more painful. Coming back to the same fear "what if it's a no?", but one needs to realise that by not saying what one feels, one is going to lose that person eventually probably forever, something that is inevitable.

Today when I see people chatting on whatsapp, facebook instead of having actual conversations, I feel that they are missing so many chances of creating some beautiful memories. When I go to public places like restaurants, malls, I often see people having lunches, dinners with each other but instead of conversing with each other, they are seen busy checking each other's statuses on their mobiles. I feel sad for them, since so much can be expressed just by saying things instead of typing them. "*Words as they say have a powerful impact when expressed than written*".

Someone has rightly said, that friendship is the first and the last step in love. It's the journey between them that one needs to complete.

Life generally doesn't give anyone a second chance, so if there is someone special in your life, someone you love, someone with whom you want to spend the rest of your life, someone with whom you want to get old with, then go and tell that person, take that step...make a move...take a leap…

✳

## पाठारे प्रभु महिला समाज

पाठारे प्रभु महिला समाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दिनांक १२ ऑगस्ट २०१८ रोजी प्रभु सेमनरी शाळा सभागृह, ठाकुरद्वार येथे दुपारी ४ वाजता सुरू होऊन गणसंख्येअभावी सभा स्थगित करून पुन्हा त्याच ठिकाणी ४.३० वाजता घेण्यात आली. समाजाध्यक्षा सौ. नीता सेंजित यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करून सभेचे परिपत्रक वाचले. त्यानंतर चिटणीस सौ. पल्लवी कोठारे यांनी रविवार दिनांक ६ ऑगस्ट २०१७ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून सभेपुढे मंजुरीसाठी ठराव मांडला. मग १ एप्रिल २०१७ ते ३१ मार्च २०१८ सालच्या समाजाच्या वार्षिक अहवालातील चुकांच्या दुरुस्तीनंतर मंजूर करण्याचा ठराव सं. चिटणीस सौ. रश्मा विजयकर यांनी सभेपुढे मांडला. त्यानंतर लेखा परिक्षकाने तपासलेले समाजाचे १ एप्रिल २०१७ ते ३१ मार्च २०१८ पर्यंतच्या जमाखर्चाचे तक्ते व ताळेबंदपत्रक खजिनदार कुमारी शोभना जयकर यांनी वाचून मंजुरीसाठी सभेपुढे ठेवले. त्यानंतर लेखा परीक्षक म्हणून एस.आर. गोखले आणि कंपनीच्या श्री. शशांक गोखले यांची २०१८-२०१९ सालासाठी नियुक्ती करण्याचा ठराव उपाध्यक्षा सौ. साया नवलकर यांनी मंजुरीसाठी मांडला. तसेच विश्वस्त श्रीमती सुबोध प्रधान यांचा राजीनामा वाचून मंजूर करण्यात आला. त्यांच्या कार्याचा आढावा विश्वस्त श्रीमती वंदना नवलकर यांनी घेतला तर त्यांच्या रिक्त झालेल्या पदी नवीन विश्वस्त म्हणून श्रीमती रेणुका धुरंधर यांच्या नियुक्तीचा ठराव मांडण्यात आला. वरील सर्व ठराव एकमताने मंजूर करण्यात आले.

त्याचदिवशी विविध स्पर्धा घेण्यात आल्या. यात स्मरणशक्ती स्पर्धेतील विजेते पुढीलप्रमाणे -

प्रथम क्रमांक - सौ. शर्मिला नीलेश विजयकर

द्वितीय क्रमांक - सौ. ईश्वरी जयकर - शहा

तृतीय क्रमांक - सौ. स्वप्ना विनित जयकर

उत्तेजनार्थ सौ. मिनल हेमंत जयकर, सौ. शलाका निलेश विजयकर

सर्व विजेत्यांना व स्पर्धकांना विश्वस्त श्रीमती वंदना नवलकर यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. तसेच या स्पर्धेचे परीक्षण विश्वस्त श्रीमती स्वाती जयकर यांनी केले.

याशिवाय ''माजी विद्यार्थ्यांची पुनर्भेट'' या विषयावर महिलांसाठी निबंध स्पर्धा आणि 'मैत्री' या विषयावर

(पान ६ कॉलम ४ वर)

**अद्‌भूत गोष्टी-**

## अनुभव

# ही घटनाही स्वयंस्फूर्त मानवी ज्वलनचा प्रकार तर नसेल?

**-विनय त्रिलोकेकर**

काही वर्षांपूर्वी टाईम्स ऑफ इंडियामध्ये असा मजकूर छापून आला होता:-

*तामिळनाडूत तिन्डीवनम नावाच्या एका खेड्यात एक राहुल नावाचा अडीच-तीन महिन्यांचा मुलगा एका दुर्मीळ रोगाने (रोग म्हणण्यापेक्षा परिस्थितीने ) गांजला आहे. (१९९५ डब्ल्युएचओच्या नोंदीप्रमाणे गेल्या ३०० वर्षात केवळ २०० व्यक्तींना ही बाधा झाली आहे) जन्मापासून अजूनपर्यंत त्याच्या शरीराने चार ते पाचवेळा अचानकपणे पेट घेतला आहे. त्याच्या शरीरातून अक्षरश: ज्वाळा बाहेर येतात. किलपॉक मेडिकल कॉलेज हॉस्पिटलमध्ये त्याच्यावर उपचार चालू आहेत. डॉक्टर भाजल्याने झालेल्या त्याच्या जखमा बऱ्या करण्यास झटत आहेत. त्याला 'स्वयंस्फूर्त मानवी ज्वलन' [Spontaneous Human Combustion (SHC)] असा दुर्मीळ रोग (?) झाला आहे असे निदान केले जाते.*

ह्याची सुरुवात राहुल ९ दिवसांचा असताना झाली. ह्या कोवळ्या मुलाच्या अंगातून अचानक ज्वाळा येऊ लागल्या. त्याची आई, राजेश्वरीचा स्वत:च्या डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता. त्याला तातडीने विल्लीपुरम मेडिकल कॉलेजमध्ये हलविण्यात आले. त्याच्यावर उपचार चालू झाले. तो बराही झाला. तीन दिवसात डिस्चार्ज मिळाला. त्याला घरी आणले खरे, पण काही दिवसांत तोच प्रकार पुन्हा घडला.

''डॉक्टर मला म्हणाले की, माझा मुलगा सुदृढ आहे आणि त्याचे सर्व अवयव उत्तम आहेत. पण गेल्यावेळी जेव्हा त्याच्या अंगाने पेट घेतला तेव्हा त्याचे पूर्ण अंग, डोक्यापासून पायाच्या तळव्यापर्यंत भाजले होते,'' असे राजेश्वरीबाई सांगतात.

बालरोगचिकित्सक, डॉ. नारायण बाबू, जे राहुलवर उपचार करीत आहेत म्हणतात, ''राहुलच्या त्वचेच्या छिद्रातून कोणतातरी ज्वालाग्राही वायू बाहेर पडतो व पेट घेतो. कोणता वायू आहे हे आम्हाला अजून समजले नाही.''

आज 'स्वयंस्फूर्त मानवी ज्वलना'ला गृहीत स्पष्टीकरणे देण्यात येत आहेत, त्यातील काही लोकं शास्त्रीय कारणे देतात; तर काहीं ह्या साऱ्या अद्‌भूत घटना असल्याचे सांगतात. तर्कशास्त्रावर आधारित गृहीत स्पष्टीकरण हा विज्ञानाचा अविभाज्य भाग आहे, ज्यामुळे बरेच शोध लागले आहेत आणि ज्याचा उपयोग भूमिती, बीजगणित, भूगोलमध्ये काही गोष्टी सिद्ध करण्यास केला जातो.

'स्वयंस्फूर्त मानवी ज्वलन' म्हणजे मानवी शरीराचे स्वयंस्फूर्त ज्वलन होते (शरीरातून निर्माण होणाऱ्या आगीमुळे मृत्यू, बाहेर कोठेही किंवा कोठलीही ज्वालाग्राही सामग्री आजूबाजूला नसतांना). शरीर संपूर्ण जळून भस्मसात होते. पण जळणे फक्त शरीरापुरते मर्यादित असते. सभोवताली असलेला सर्व परिसर जसाच्या तसा, आजुबाजूस असलेले फर्निचर, खालील जमीन, वरचे सीलिंग आणि जवळ असलेल्या व्यक्ती, सर्व शाबूत!

१९८४ साली श्री. जो निक्केल (एक विज्ञान संशोधक) आणि जॉन फिशर (एक न्यायिकविधी चिकित्साशास्त्रसंबंधी संस्थेचा शोधक) ह्यांनी 'स्वयंस्फूर्त मानवी ज्वलन'चा संपूर्ण अभ्यास करण्यासाठी दोन वर्षांचा एक प्रकल्प चालवला.

'स्वयंस्फूर्त मानवी ज्वलन'चे शास्त्रीय स्पष्टीकरण असे दिले जाते. आपल्या शरीरात चांगले-वाईट असे अनेक सूक्ष्मजंतू असतात. 'मेथानोजेन' नामक सूक्ष्मजंतू-विनॅक्सी जीवाणू- हे जीवाणू प्राण्यांच्या आतड्यात, सांडपाण्यात होतात/असतात. त्यांना श्वासोच्छ्‌वास करण्यासाठी नैसर्गिक प्राणवायूची गरज नसते. ते सभोवताली रासायनिक द्रवापासून प्राणवायू घेतात, ज्याला अनेरोबिक रेस्पिरेशन असे म्हणतात. उदारणार्थ; मद्यार्क तयार करतेवेळी होणारी फसफसण्याची क्रिया. हे मेथानोजेन जीवाणू त्या मानवाच्या पोटातील अन्नाचे रूपांतर मिथेन ह्या अतिज्वालाग्राही वायूत करतात आणि तो वायू त्वचेच्या छिद्रातून बाहेर येऊ लागतो आणि विविध कारणांमुळे ठिणगी लागून त्याचे आगीत रूपांतर होत असावे (अंगात घातलेल्या रेशमी कपड्यांचे घर्षण, तयार होणाऱ्या वायूचे वाढलेले प्रमाण किंवा ह्या प्रक्रियेमुळे वाढलेला रक्तदाब - अशी ही कारणे असावीत). तसेच हे ज्वलन केवळ त्या व्यक्तीच्या शरीरापुरते मर्यादित असण्याचे शास्त्रीय कारण असे सांगितले जाते की, पदार्थ विज्ञानाप्रमाणे आग ही वरवर पसरत जाते आणि तिला बाजूला पसरणे कठीण असते. म्हणून त्यांच्या (मृतदेह/पीडित व्यक्तीच्या) शरीराचा वरील भाग जास्त जळलेला आढळतो आणि पायाजवळ झळ कमी. तसेच ज्वलनाचा केंद्रबिंदू शरीराच्या टोकाच्या भागांवर असतो,जसे

(पान ६ कॉलम ३ वर)

## पाठारे प्रभु सोशल समाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा आणि कार्यकारी समितीची निवडणूक

पाठारे प्रभु सोशल समाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. १९ ऑगस्ट २०१८ रोजी खारच्या पा. प्र. हाऊसिंग सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्रात सायं. ४ वा. आयोजित करण्यात आली होती. गणसंख्येअभावी सभा ४.३० वा. पर्यंत स्थगित करण्यात आली व त्याच ठिकाणी ४.३० वा. सभेचे कामकाज सुरू करण्यात आले. समाजाध्यक्षा श्रीमती स्वाती राणे यांनी उपस्थितांचे स्वागत करून समाजाच्या कार्यकारी समितीने मागील ५ वर्षात केलेल्या कामगिरीचा आढावा घेतला. सर्वात प्रशंसनीय कामगिरी म्हणून त्यांनी समाजाच्या नियमावलीत कलानुरूप बदल करून समाजाची ट्रस्ट म्हणून चॅरिटी कमिशनरकडे नोंदणी करण्यासाठी समितीने घेतलेल्या परिश्रमाचे कौतुक केले. विश्वस्त श्री. माधव जयकर, यांनी तसेच विश्वस्त श्रीमती वंदना नवलकर यांनीही समाजाच्या विद्यमान समितीच्या कार्याची प्रशंसा केली. समाजाच्या कार्यपद्धतीत सकारात्म बदल होत असल्याचे दोन्ही विश्वस्तांनी नमूद करून यापुढेही समाज अशी मजल मारील अशी अपेक्षा व्यक्त केली. त्यानंतर समाजाध्यक्षा श्रीमती स्वाती राणे यांनी सं. चिटणीस सौ. नीता सेंजित यांना सभेचे कामकाज सुरू करण्याची विनंती केली.

सं. चिटणीस सौ. नीता सेंजित यांनी सभेचे परिपत्रक वाचून मंजूर झाल्याचे सांगून वार्षिक अहवालातील सुधारणा सभेपुढे नमूद केल्या. सं. चिटणीस श्री. जयंत कीर्तिकर यांनी मागील सर्वसाधारण सभेचे कार्यवृत्त वाचून सभेपुढे मंजुरीसाठी ठेवले व ते एकमताने मंजूर झाले. विशेष सर्वसाधारण सभेचे कार्यवृत्तही श्री. जयंत कीर्तिकर यांनी वाचून सभेपुढे मंजुरीसाठी ठेवले. श्री. अशोक तळपदे यांनी त्याबाबत काही मूल्यवान सूचना केल्या. या संदर्भात विश्वस्त श्री. माधव जयकर यांनी उत्तर दिल्यावर समाजाध्यक्षा श्रीमती स्वाती राणे यांनी त्या सूचनांचा जरूर विचार केला जाईल असे आश्वासन दिले. हा ठराव एकमताने मंजूर झाला. सौ. नीता सेंजित यांनी वार्षिक अहवाल त्यातील सुधारणेसह मंजुरीसाठी मांडला व तो एकमताने मंजूर झाला. खजिनदार श्री. सतेज तळपदे यांनी मांडलेला ३१ मार्च २०१८ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाचा ताळेबंद व जमाखर्च एकमताने मंजूर झाला. समाजाच्या गंगाजळीत गेल्या वित्तीय वर्षात २ लाख रुपयांची भर पडल्याचे त्यांनी नमूद केले. पुढील २०१८-१९ या वर्षासाठी मेसर्स एस. आर. गोखले आणि कंपनीचे श्री. शशांक गोखले, चार्टर्ड अकाऊंटंट यांच्या सेवा वार्षिक ३००० रुपये एवढा मेहनताना चालू ठेवण्यात येण्याचा प्रस्ताव श्री. तळपदे यांनी मांडला व तोही एकमताने मंजूर झाला. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या इतर विषयांमध्ये सौ. नीता सेंजित यांनी समाजाची तहहयात सभासद फी २०-८-२०१८ पासून रु. ३०१ ऐवजी रु. ५०० एवढी करण्याचा प्रस्ताव मांडला. श्री. निकोलाय कीर्तिकर यांनी सभासदांचे वेगवेगळे वर्ग करून वेगवेगळी फी आकारावी म्हणजे समाजाच्या गंगाजळीत वेळोवेळी भर पडेल अशी सूचना मांडली. श्री. जयंत कीर्तिकर यांनी असे करण्यात बऱ्याच व्यावहारिक अडचणी येतील असे खुलासेवार पटवून दिले. श्री. मिलिंद सेंजित यांनी असे वेगवेगळे वर्ग करणे हे सोशल समाजाच्या मूलभूत ब्रीदाविरूद्ध होईल असे सांगून 'सोशल' या शब्दाच्या अर्थाला ते हानिकारक ठरेल असे नमूद केले. नंतर फीवाढीचा प्रस्ताव एकमताने मंजूर झाला.

त्यानंतर कार्यकारी समितीच्या निवडणुकीची जबाबदारी निवडणूक अधिकारी श्री. उदय मानकर व श्री. सुनील जयकर यांनी संयुक्त चिटणीसांच्या व विश्वस्तांच्या साहाय्याने उचितरित्या पार पाडली. एकूण १८० सभासदांनी मतदान केले. विश्वस्त श्री. माधव जयकर यांनी निवडणूक अधिकाऱ्यांनी कार्यक्षमतेने व शांततापूर्ण वातावरणात निवडणुका पार पडल्याबद्दल त्यांचे आभार मानले.

निवडणुकीचा निकाल पुढीलप्रमाणे-

१. श्री. जयंत कीर्तिकर - संयुक्त चिटणीसपदी बिनविरोध निवडून आले.

२. सौ. नीता सेंजित बिनविरोध निवडून आल्या

३. श्री. सतेज तळपदे - खजिनदार - बिनविरोध निवडून आले.

खालील सदस्यांना पडलेली मते

४. सौ. नूतन कीर्तिकर - ९४
५. श्रीमती स्वाती राणे - ९४
६. सौ. उन्नती राणे - ८४
७. सौ. पल्लवी कोठारे - ८३
८. श्री. तुषार कीर्तिकर - ८२
९. श्री. प्रसाद कीर्तिकर - ८१
१०. श्री. अभिजित विजयकर - ७८
११. श्रीमती शिल्पा धुरंधर - ७८
१२. श्री. राहुल आगासकर - ७६
१३. श्री. अमोघ कीर्तिकर - ७५
१४. सौ. माधुरी किर्तीकर - ७२
१५. श्री. मिलींद सेंजित - ७२
१६. श्री. उमेशचंद्र किर्तीकर - ७१
१७. श्री. विजय धुरंधर - ७०
१८. श्री. अनिरुद्ध कीर्तिकर - ६१

उपस्थितांना सभेदरम्यान कॉफी आणि मतमोजणी दरम्यान अल्पोपहार देण्यात आला. वार्षिक सर्वसाधारण सभेचे व निवडणूक प्रक्रिया व निकाल जाहीर करण्याचे कामकाज ९ वा. संपन्न झाले.

(वार्तांकन - श्रीमती स्वाती राणे)

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शालाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचितक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचितक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणास देणगी

∗ श्रीम. अल्पना वैभव तळपदे यांची पंजाब ॲण्ड सिंध बँकेत असिस्टंट जनरल मॅनेजर पदावर नियुक्ती झाल्याप्रीत्यर्थ, तसेच कै. श्री. वैभव कुंजविहारी वाय.जी. तळपदे आणि कै. श्री. कुंजविहारी वाय. जी. तळपदे स्मरणार्थ हितचिंतकाकडून रु. १००१/-

देणगीदाराचे आभार

∗

## अभिनंदन

∗ श्री. राजन जयकर यांच्या स्टँप संग्रहाचे 'प्राग' येथे प्रदर्शन झाले. जागतिक स्टँप प्रदर्शनात त्यांनी भारताचे प्रतिनिधीत्व केले. 'डेड लेटर ऑफिसेस इन इंडिया टिल १९४७'- असा त्यांचा या स्टँपबाबतीत विषय होता. तसेच ३१ ऑगस्टला चित्रतपस्वी रावबहाद्दूर म. वि. धुरंधर यांनी लिहिलेल्या 'माझ्या कलाजीवनातील एकेचाळीस वर्षे' या आत्मकथनाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले.

∗ डॉ. प्रफुल्ल गजानन विजयकरांचे 'पद्मश्री' किताबासाठी नामांकन झाले.

∗ 'शांता शेळके काव्य पुरस्कार' निवड समितीत प्रमुख समन्वयक म्हणून प्रा. सुहासिनी कीर्तिकर यांची नियुक्ती झाली. झी मराठी 'दिशा'च्या सुखकर्ता विशेषांकात त्यांचा 'आरती'वर लेख प्रसिद्ध झाला. मुंबई मराठी साहित्य संघाच्या नियामक मंडळात सदस्य म्हणून त्यांची बिनविरोध निवड झाली.

∗ श्री. प्रताप वेलकर यांचे 'शूरा मी वंदिले' हे पुस्तक नुकतेच प्रकाशित झाले. या पुस्तकाला श्री. दीपक टिळक यांची नेटकी प्रस्तावना आहे आणि पुस्तकाचे मुखपृष्ठ ख्याती वेलकरच्या कुंचल्यातून उतरले आहे.

∗

## परीक्षेतील सुयश

**एमबीए**

श्री. निहाल तुषार कीर्तिकर

∗

## चुकीची दुरुस्ती

∗ प्रभुतरुण ऑगस्ट २०१८च्या अंकात दुसऱ्या पानावरील मजकूर खालीलप्रमाणे वाचावा

**लठ्ठपणाविरोधी लढवय्याची अखेर!**

``BATTLE OF THE BULGE" ह्याच यथोचित नाव लाभलेल्या त्यांच्या पुस्तकामध्ये त्यांनी केलेल्या संघर्षाची पूर्ण माहिती आपल्याला वाचायला मिळते. आज ``Obesity Consultants" हे जागोजागी दिसतात.

-संपादक

∗ प्रभुतरुणास देणगी या सदरात गतांकी आद्या निखील नवलकर असे कृपया वाचावे. ते मुद्रणदोषामुळे आद्या स्वप्नील नवलकर असे छापले गेले आहे.

∗ अभंगयात्रेत देवश्री वेलकर यांनी 'मोगरा फुलला' हा अभंग म्हटला तेथे चुकून 'धुरंधर' छापले गेले आहे.

## प्रभुतरुणाची डायरी

### जनन

१९-६-१८ सौ. श्वेता आणि श्री. विक्रम सुनील जयकर, कन्या, सांताक्रूझ

### मरण

२९-७-१८ श्री. नीलेश सनतकुमार कोठारे, वय ६३, बोरीवली
२८-८-१८ श्रीम. यशोदिनी यदुवीर राणे वय ८४, अंधेरी

(पान ५ कॉलम २ वरून)

पायांची बोटे आणि ह्यांत बळी पडलेल्या व्यक्तींच्या शरीरावरील कपड्यांवर. ज्वलनाची क्रिया पुढे चालू ठेवण्यासाठी शरीरातील चरबी पूरक असते. उष्णतेमुळे चरबी वितळते, वितळलेली चरबी जाळण्यास मदत करते, उष्णता वाढते आणि अधिक चरबी वितळते. अशा रीतीने एक चक्र सुरू होते, ज्याला 'मेणबत्ती परिणाम' किंवा 'वात परिणाम' असे म्हणतात. पण हे संशोधक असा सल्ला देतात की, प्रत्येक परिस्थितीचा बारकाईने अभ्यास करणे जरुरीचे असते आणि त्यानंतरच परिस्थितीनुसार निष्कर्ष काढून त्यावर उपचार करावा.

पण विरोधकांना 'स्वयंस्फूर्त मानवी ज्वलन' ही कल्पना रुचत नाही. त्यांना ही वास्तविक वाटत नाही. असे घडत असेल तर फार थोड्यांच्या बाबतीतच का घडते? ह्या घटना दुर्मीळ का? एवढी आबादी, मग ३०० वर्षांत केवळ २०० व्यक्तींना ही बाधा झाली? टक्केवारी काढणेही निरर्थक! जगात ७ दशलक्ष माणसे, कदाचित त्याहून अधिक, तरीही आपल्याला असे वाचायला का मिळत नाही रस्त्यातून चालत असलेल्या माणसांना आगीने भस्मसात केले, फूटबॉलच्या मैदानात प्रेक्षक जळून खाक झाले, कॉफी शॉपमध्ये सर्व ग्रिहाईकांचे शरीर पेटले. जे अद्‌भुत गोष्टींवर विश्वास ठेवतात ते म्हणतात, ह्या सर्वांना 'एण' असे न म्हणता, त्यांना 'UDBF' [unsolved death by fire], म्हणजे 'आगीमुळे मृत्यूचे न सुटलेले कोडे'. तर काहीना वाटते हा भानामतीचा प्रकार असावा. जादूटोणा, भुताटकी, देवाचा कोप, अशी विविध नावे देतात. मग सुरू होतो पीडित आणि त्यांच्या घरातल्यांचा एक प्रवास. ह्या देवळात जा, त्या देवाला नवस घे, कुलदेवतेला साकडे घाल, वांद्र्याला मोथमावलीला जाऊन ये, हाजी मलंगला जा, वगैरे, वगैरे. साधूंकडे जाणे होते. ख्रिस्ती पाद्री, फकीर, पीर, हे सारे करून पाहतात. जर का एखादा केलेला उपाय (योगायोगाने) फायदेशीर ठरलाच तर त्याचा गवगवा होतो. माझा ह्या सर्व गोष्टींकडे बघण्याचा दृष्टीकोन वेगळा आहे. कोणत्याही गोष्टींचा किंवा कोणाबद्दल पूर्वग्रह नसावा. ही गोष्ट खरी, ती गोष्ट खोटी, हा माणूस वाईट, तो चांगला, अशी विधाने संपूर्ण शहानिशा न करताच करणे मला बरोबर वाटत नाही. म्हणून वाचकांपुढे दोन्ही बाजू मांडणे मला इष्ट वाटते. म्हणूनच 'ही घटनाही स्वयंस्फूर्त मानवी ज्वलनाचा प्रकार तर नसेल ?' असा प्रश्न आपल्यासमोर ठेऊन पुढील गोष्ट लिहीत आहे. सर्व व्यक्तींची नावे बदलून लिहीत असलो तरी लिहीत असलेली गोष्ट एक सत्य घटना आहे.

(क्रमशः)

(पान ४ कॉलम ४ वरून)

काव्य स्पर्धा घेण्यात आली.

निबंध व काव्य स्पर्धा निकाल :-

१) निबंध स्पर्धा महिलांसाठी (१५ वर्षांवरील)

विषय - माजी विद्यार्थ्यांची पुनर्भेट
प्रथम क्रमांक - सौ. जयमती जयपाल तळपदे
द्वितीय क्रमांक - सौ. रजनी नितीन कोठारे
तृतीय क्रमांक - सौ. स्वप्ना विनीत जयकर

निबंध स्पर्धा - मुलींसाठी (१५ वर्षाखालील)

विषय - माझा आवडता हिरो
प्रथम क्रमांक - कु. अलीशा निकोलाय कीर्तिकर
द्वितीय क्रमांक - कु. आदिती आशीष व्यवहारकर
तृतीय क्रमांक - कु. अनन्या अश्लेष वाझकर

काव्यस्पर्धा–

विषय - मैत्री
प्रथम क्रमांक - सौ. जयमती जयपाल तळपदे
द्वितीय क्रमांक - सौ. रजनी नितीन कोठारे
तृतीय क्रमांक - सौ. स्वप्ना विनित जयकर

यानंतर सर्व उपस्थितांना कॉफी पानाची लज्जत चाखता आली आणि सभा समाप्त झाली.

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह ॲंड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67